**प्रेस नोट दिनांक ०९/०४/२०१९**
**खडक पोलीस ठाणे, पुणे शहर**
**हरविलेल्या ४ वर्षीय लहान मुलीचे नातेवाईकांचा शोध घेवून मुलीस नातेवाईकाच्या ताब्यात.**

दि. ०१.०४.२०१९ रोजी कासेवाडी पोलीस चौकीचे डयुटी अंमलदार पो.हवा.शंकर जावळे, बीट मार्शलवरील कर्मचारी पोना माळी, पो.शि. गायकवाड असे कासेवाडी चौकी हद्दीत पेट्रोलींग करीत असताना जयप्रकाश बालवाडी मागे एक चार वर्षीय मुलगी चुकलेल्या अवस्थेत रडत असताना मिळुन आली. सदर मुलीबाबत आजु-बाजूचे लोकांकडे चौकशी करता काही माहिती मिळाली नाही. सदरची मुलगी लहान असल्याने ती तिचे नाव सांगु शकत नव्हती. सदर मुलीबाबत कासेवाडी पोलीस चौकी हद्दीत माहिती घेत असताना मुलीची आजी सौ.शकिला अहमद शेख,वय-५५ वर्षे, रा.कासेवाडी भवानी पेठ,पुणे ह्या मिळुन आल्या. त्यांचेकडे सदर मुलीबाबत चौकशी करता त्यांची नात ही सरकारी ऊर्दू हायस्कुल पुना शाळे जवळ के.जी.चे वर्गात शिकत असून शाळा सुटल्यानंतर ती एकटीच बाहेर येवून चुकली असल्याचे सांगितले. सदर मुलीस तीचे आजीचे ताब्यात सुखरूप परत करण्यात आले आहे.

दि.०६/०४/२०१९

**(राजेन्द्र मोकाशी)**
वरिष्ठ पोलीस निरीक्षक,
खडक पोलीस ठाणे, पुणे शहर

